# B.K. BIRLA CENTRE FOR EDUCATION

SARALA BIRLA GROUP OF SCHOOLS
A CBSE DAY-CUM-BOYS' RESIDENTIAL SCHOOL

**PER BOARD-1 EXAMINATION (2025-26)**

**MARATHI**

Class : X | Duration : **3** Hrs
Date : 10.11.2025 | Max. Marks : **80**
Admission No.: | Roll No.:

---

कृतिपत्रिकेसाठी सूचना :

(1) उत्तर पत्रिकेत विभाग नमूद करावेत.

(2) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष दयावे.

---

## विभाग (अ) वाचन व आकलन गुण (15)

**प्र 1 :– (आकलन ) अ: अपठित गद्यांश :–**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक,आदर्श शासनकर्ता,जाणता राजा,श्रीमान योगी अशा विविध नावांनी छत्रपती शिवाजी महाराजांना संपूर्ण जगात ओळख प्राप्त झाली आहे. त्यांना मिळालेले हे यश सहजसोपे होते का? महाराष्ट्र म्हणा अथवा संपूर्ण हिंदुस्तान पारतंत्र्यात असताना, मोगल,आदिलशाही,निजामशाही सामान्य जनतेचे लचके तोडत असताना राजमाता जिजाबाईंनी पाहिलेल्या स्वराज्याच्या स्वप्नाची पूर्तता करण्याची शपथ शिवरायांनी वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी घेतली.

स्वराज्याची निर्मिती करणे दूरची गोष्ट तसा विचार करणेदेखील सोपे नव्हते.अंगी असलेल्या सामर्थ्यानिशी मावळयांच्या साथीने,आपल्या चाणाक्ष बुद्धीने योग्य नियोजनाने महाराजांनी आपल्या पेक्षा बलाढय शत्रूचा पराभव केला.सहयाद्रीच्या कडेंकपारीत घोडदौड करणारे,नजरकैदेतून स्वत:सह आपल्या मावळयांची सुटका करणारे,अफझलखान,शायिस्तेखान यांना नामोहरम करणारे छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे बुद्धी,धैर्य,शौर्य,पराक्रम आणि जिद्दीचे मूर्तिमंत उदाहरण आहेत.महाराजांचा सर्वात मोठा गुण म्हणजे त्यांनी कधी जाती–धर्मांसाठी संघर्ष केला नाही. त्याचा संघर्ष होता मानवतेसाठी, म्हणूनच त्यांना रयतेचा राजा म्हटले जाते.

**प्र 1 (अ) खालील प्रश्नांची उत्तरे पर्यायामधून निवडा:–** **(3X1=3)**

1 रयतेचा राजा कोणाला म्हटले आहे?
- **अ** संभाजी  **ब** दादोजी
- **क** शिवाजी  **ड** राणोजी

**2** स्वराजाचे स्वप्न कोणी पाहिले?
- **अ** जिजाबाई  **ब** लक्ष्मीबाई
- **क** आहिल्याबाई  **ड** बहिणाबाई

**3** राजांचा संघर्ष कशासाठी होता?
- **अ** धर्मांसाठी  **ब** असहयांसाठी
- **क** जातीसाठी  **ड** मानवतेसाठी

**प्र 1 (ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :–(कोणतेही तीन)** **(3X1=3)**

1 छत्रपती शिवाजी महाराजांना संपूर्ण जगात कोणकोणत्या नावाने ओळखले जाते?
2 शिवरायांनी कशाची शपथ घेतली?
3 कशाच्या मदतीने महाराजांनी आपल्यापेक्षा बलाढय शत्रूचा पराभव केला?
4 त्या काळी सामान्य जनतेचे लचके कोण तोडत होते?

प्र 1 (क) उताऱ्याच्या आधारे खालील प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहा :–(कोणताही एक) (1X2=2)

1 छत्रपती शिवाजी महाराज कशाचे मूर्तिमंत उदाहरण आहेत?

2 छत्रपती शिवाजी महाराज यांना रयतेचा राजा का म्हटले जाते?

**प्र 2 (आकलन ) अपठित पद्यांश :–**

पाऊस घरावर आला
भिजवून घरटे गेला
मज कोरडया घराला
रडवून आज गेला

या कोसळत्या पावसाला
कां किव जराशी नाही
कां जाणही नसावी
या घरात जीव राही

नको नको रे पावसा
थैमान असा तू घालू
मन विव्हळे वेदनांनी
मी वाट कसा ही चालू?

पुरे झाला उच्छाद सारा
थांबव जरा या कोसळधारा
ध्वस्त घरटी विखुरली धरा
तव क्रौर्याचा हा पुरावा सारा

वाहूनी सर्वस्व गेले
अश्रूत न्हाउनी गेले
निरोप घेता जगाचा
पावसा हरवून तुझ्यात गेले

**प्र 2 (अ) खालील प्रश्नांची उत्तरे पर्यायामधून निवडा :–** **(3X1=3)**

**1** पाऊस काय भिजवून गेला?

**अ** घरटे **ब** महाल
**क** झोपडी **ड** गाव

**2** उच्छाद कोणी मांडला आहे?

**अ** विदयार्थ्यांनी **ब** कामगारांनी
**क** वादळाने **ड** पावसाने

3 ध्वस्त काय झाली आहेत?

**अ** घरे **ब** पिके
**क** घरटी **ड** धरती

**प्र 2 (ब) एका वाक्यात उत्तरे लिहा :–** **(4X1=4)**

**1** कवी कोठे हरवून गेला आहे?
**2** पावसामुळे धरती कशी झाली आहे?
**3** कवी पावसाला काय थांबवण्याची विनंती करीत आहे?
**4** मन कशामुळे विव्हळत आहे?

## विभाग :– ब ( 20 गुण)

**प्र 3 (अ) शब्दांच्या जाती ओळखा :– (कोणतेही चार)** **(4X1=4)**

**1** मी आणि तू दोघे मिळून खेळ खेळू.

**अ** सर्वनाम **ब** विशेषण
**क** नाम **ड** अलंकार

2 बापरे! किती भयानक हा अपघात! ( केवलप्रयोगी अव्यय ओळखा)

**अ** किती **ब** बापरे

**क** भयानक **ड** हा

3 शाळेमध्ये गुणी विदयार्थी आहेत. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

**अ** क्रियाविशेषण अव्यय **ब** विशेषण

**क** शब्दयोगी अव्यय **ड** सर्वनाम

4 विदयार्थ्यांनी काल मैदानावर खूप खेळ खेळला. ( क्रियाविशेषण अव्यय ओळखा)

**अ** काल **ब** खूप

**क** मैदान **ड** मुले

5 ताई आली **आणि** तिने घरातील साफ–सफाई केली. ( आधोरेखित शब्दाची जात ओळखा)

**अ** विशेषण **ब** उभयान्वी अव्यय

**क** क्रियाविशेषण अव्यय **ड** अलंकार

**प्र 3 (ब) काळ ओळखा व बदला ( कोणतेही तीन) (3X1=3)**

1 मेघा आज घरी आली आहे. ( काळ ओळखा).

2 राधिका दिलेला गृहपाठ पूर्ण करेन. ( काळ ओळखा)

3 आई काल सकाळपासून काळजीत होती . ( वर्तमानकाळ करा )

4 ते फार प्रसिद्ध व्यावसायिक होते.(काळ ओळखा)

**प्र 3 (क) वाक्याचे प्रकार ओळखा ( कोणतेही तीन) (3X1=3)**

1 वाह! किती सुंदर आहे हे मंदिर!

2 ही नदी स्वच्छ आहे.( नकारार्थी करा )

3 तुम्ही आतापर्यंत किती अभ्यास केला ?

4 मोठयाने बोलू नका.

**प्र 3 (ड) समानार्थी शब्द ( कोणतेही दोन) (2X1=2)**

1 कोलाहल = 2 गिरी = 3 गड =

**प्र 4 (अ) विरुध्दार्थी शब्द ( कोणतेही दोन) (2X1=2)**

1 विवेकी × 2 सुरेल× 3 दोषी×

**प्र 4 (ब) लिंग बदला ( कोणतेही दोन) (2X1=2)**

1 वीर 2 विधुर 3 दोर

**प्र 4 (क) वचन बदला ( कोणतेही दोन) (2X1=2)**

1 अंडे 2 प्रश्न 3 खारीक

**प्र 4 (ड) समास ओळखा ( कोणतेही दोन) (2X1=2)**

1 घरदार 2 पंचपाळे 3 दररोज

## विभाग–क पाठयपुस्तक आधारित (30 गुण)

**प्र 5 (अ) एका वाक्यात उत्तरे लिहा (कोणतेही तीन) (3X1=3)**

1 सत्कारात अब्दुलला काय मिळाले?

2 कथेच्या यशाचे काय रहस्य आहे?

3 मराठी भाषादिन केव्हा साजरा होतो ?

4 वनज कमी करण्यासाठी पंतांनी पहिला उपाय कोणता केला?

**प्र 5 (ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा (कोणतेही तीन) (3X1=3)**

1 ––––– तंत्रामुळे मी खुलते.

2 निरंजन मावशीच्या घरी ––– काम करायचा.

3 –––– पूरक वातावरण नव्हते.

4 या हिरव्यागर्द झाडांनी आपली काळीकुट्ट पावलं थोडी तरी ––––– होतील.

**प्र 5 कः– खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहाः–** **(1X3=3)**

1 भावे सरांचे शब्द हीच खरी माशेलकरांची ऊर्जा या विधानाचा तुम्हाला समजलेला अर्थ लिहा –

2 कादंबरीने करून दिलेला स्वतःचा परिचय तुमच्या शब्दांत लिहाः–.

3 दुसऱ्या दिवशी पंतांचा व्रतभंग कसा झाला ?

**प्र 5 डः– वाक्प्रचारांचा योग्य वापर करून वाक्य पुन्हा लिहा :–** **(5X1=5)**

**( दम भरणे/भानावर येणे/नवल वाटणे/चलबिचल होणे/उदयुक्त करणे)**

1 रमणने गावातील मुलांना मार्गदर्शन करत अभ्यासाला प्रेरित केले.

2 टाळयांच्या गजराने बबनराव शुद्धीवर आले.

3 शिक्षकांनी मस्ती करणाऱ्या मुलांना खडसावले.

4 मानसाळलेला वाघ पाहून आम्हांला आश्चर्य वाटले,

5 समोर समोसे पाहताच राधाबाईचे मन अस्थिर झाले.

**प्र 6 अ :– (अ) एका वाक्यात उत्तरे लिहाः– ( कोणतेही चार )** **(4X1=4)**

1 शेकडोवेळा काय झाले?

2 कशाचा ललकार घुमावा असे कवी किशोर पाठक यांना वाटते?

3 तोफा धडाडताना सैनिकाचे पाऊल कसे पडते ?

4 कवीचे हात कोणाकडे गहाण पडले?

5 हरिणी कोणासाठी चिंतीत आहे ?

**प्र 6 (ब) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :–(कोणतेही चार)** **(4X1=4)**

1 घराघरांतून जन्म घेतेसे तेज नवा ––––––..

2 फुलामुलांतून हसतो ––––

3 –––– करतो आहे किती डोईवर राहिले उन्हाळे.

4 भविष्य उज्ज्वल या –––– करूया जयजयकार.

5 –––– मी दास तुझा .

**प्र 6 क) खालील काव्यपंक्तींचे संदर्भासहित स्पष्टीकरण कराः–(कोणतेही एक)** **(1X3=3)**

या हातांनी यंत्र डोलते
श्रमशक्तीचा मंत्र बोलते
उदयोगाचे चक्र चालते
आभाळावर उत्क्रांतीचा घुमवू या ललकार।।

**किंवा**

वर घोंघावे बंबारा
पुढे कल्लोळ धुरांचे
धडाडत्या तोफांतून
तुझे पाऊल जिद्दीचे

**प्र 7 अ स्थूलवाचन :– एका वाक्यात उत्तरे लिहा :– ( कोणतेही तीन )** **(3X1=3)**

1 अखिल भारतीय मराठी संमेलन केव्हा व कुठे भरले होते ?

2 दिवाळी हा शब्द मूळ कोणत्या भाषेतून आला आहे ?

3 व्युत्पत्ती कोशाचे अध्यक्ष कोण होते?

**प्र 7 (ब) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर 40ते 50 शब्दात लिहा :–** **(1X2=2)**

1 स्काय इज लिमिट ही परिस्थिती केव्हा निर्माण होऊ शकते ?

2 व्युत्पत्ती कोशाची कार्य थोडक्यात लिहा–

## विभाग– ड लेखन– (गुण 15)

**प्र 8 अ खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा :–** **(1X6=6)**

1 म्हाताऱ्या बैलाचे आत्मवृत्त

मुद्‌दे:– जन्म, बालपण–––तारूण्यातील आनंदी व कष्टाळू जीवन––– शेतकऱ्याच्या प्रगतीला कारणीभूत––– वय झाले––– होणारा त्रास––– जीवनाचे सार्थक.

**2 जगातील पाणी संपले तर ......**

**मु**द्‌दे :– पाणी म्हणजे जीवन–– पाण्यामुळे स्वच्छता––प्राणी पक्षी झाडे सर्वांसाठी पाण्याची गरज––पाणी नाहीशे होण्याची कारणे–– पाण्याशिवाय जगाची अवस्था–पाणी टिकवण्यासाठी घ्यावी लागणारी मेहनत– पाणी नसेल तर होणारे दुष्परिणाम.

**3 पुस्तक एक खरा मित्र**

मुद्‌दे :– पुस्तकांचे जीवनातीन स्थान––प्रेरणा देणे ––शब्दशक्ती– जडणघडणीस मदत– उपदेश – खरा निःस्वार्थी मित्र –––कायम साथ देणारा –– समाजमन घडवण्यात पुस्तकांचा वाटा.

**प्र 8 (ब) मुद्‌दयावर आधारित गोष्ट लिहा. (शीर्षक आणि तात्पर्य आवश्यक)** **(1X5=5)**

एक तलाव––एक कासव पाण्याबाहेर येणे काठावर बेडूक उडया मारत मजा करणे–––आपल्या जड शरीराकडे पाहून कासव दुःखी––अचानक आकाशातून घार येणे–– बेडकाला उचलून नेणे––– कासव स्वतःबद्‌दल दुःख करणे सोडून देणे–––तात्पर्य .

**किंवा**

एक शेतकरी ––– काटयात अडकलेला गरूड–– गरूडाची सुटका करणे––– काही दिवसांनी शेतकरी एका पडक्या भिंतीजवळ बसणे –– गरूड शेतकऱ्याचे पागोटे पळविणे––शेतकऱ्याला गरूडाचा राग येणे–––भिंत पडणे –––शेवटी गरूडाचे आभार मानणे–––तात्पर्य.

**प्र 8 (क) पत्र लेखन :– ( कोणतेही एक )** **(1X4=4)**

अनुप जाधव/आदिती जाधव,विदयार्थी प्रतिनिधी,सावित्रीबाई फुले,विदयामंदिर,क्रांती चौक,सातारा हा/ही या शाळेसमोरील रस्ता पावसामुळे खराब झाला.आहे याची तक्रार करणारे पत्र मा. अधिकारी सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा यांना लिहित आहे.

**किंवा**

वनमहोत्सवात वृक्षारोपण करण्यासाठी रोपे मागवणारे पत्र रीमा/रितेश प्रधान, विदयार्थी प्रतिनिधी, शाहू दयानंद हायस्कूल, सांगली येथून वन अधिकारी,वनविभाग सांगली यांना लिहित आहे.

**:::::::::::::::::::: समाप्त :::::::::::::::::::::::**